जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२६/१२/२०२३
## दि.२५/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो.स्टे.५९१/२०२३,भादविक ३०७,३२६,३२४,१४३,१४४,१४७,१४८,१४९ आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३),सह १३५ क्रिमीनल लॉ ॲमिटमेंट कलम ०३ व ०७, |
| **फिर्यादी** | सौरभ पाडळे वय २२ वर्षे, रा.वडगांवशेरी पुणे |
| **आरोपीत** | १) अनुज जितेंद्र यादव,वय १९ वर्षे,रा.ओम गंगोत्री सोसायटी,स्टेला मेरी शाळेजवळ,वडगावशेरी पुणे २) हरिकेश टुणटुण चव्हाण, वय १८ वर्षे,रा.ओंकार सोसायटी,आनंदपार्क,वडगावशेरी पुणे ३) आकाश भारत पवार, वय २३ वर्षे,रा.श्रीनगरी सोसायटी,आनंदपार्क,वडगावशेरी पुणे ४) अमोल वसंत चोरघडे,वय ३० वर्षे,रा.राजश्री कॉलनी,वडगावशेरी पुणे (अटक) व इतर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/१२/२०२३ रोजी २२/४५ वा.चे सुमारास आनंदपार्क कडुन,वडगांवशेरीकडे जाणारे रोडवरील पवन सुपर मार्केटचे शेजारी दिगंबरनगर वडगांवशेरी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हा त्याचा मित्र ऋषीकेश याची यातील इसम नामे आकाश पवार याचे सोबत झालेली भांडणे मिटविण्यासाठी गेलो असता, आकाश पवार याने ऋषीकेशच्या कानाखाली मारली, त्याचवेळी अनुज यादव याने त्याचेकडे असलेल्या लोखंडी हत्याराने ऋषीकेश यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने उजवे हाताचे मनगटावर,डोक्यावर वार करुन गंभीर जखमी केले.तसेच नमुद इसमांनी मोठमोठ्याने शिवीगाळ करुन यांना कोणालाच सोडु नका असे म्हणुन तेथे पडलेल्या दगड व विटांनी मारहाण केली.तसेच फिर्यादी व त्याचे इतर मित्र असे ऋषीकेशला वाचविण्यासाठी गेले असता, अनुज याने त्याचेकडे असलेल्या कोयत्याने फिर्यादी यांचे डोक्यावर तसेच फिर्यादी याचे इतर दोन मित्रांन वर वार करुन गंभीर जखमी केले. तसेच त्याचे हातामध्ये असलेले लोखंडी हत्यार हवेत फिरवुन व त्याचेबरोबर असलेल्या इतर मुलांनी हातामध्ये दगड व विटा घेवुन, कोणमध्ये आले तर सोडणार नाही असे म्हणुन दहशत निर्माण करीत निघुन गेले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.निलेश घोरपडे,मो.नं.९४०३०४८७६७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो.स्टे.४७४/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | प्रविण तायल वय ४३ वर्षे, रा.बोपोडी पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २२/१२/२०२३ रोजी रात्रौ २१/०० ते दिनांक २३/१२/२०२३ रोजी सकाळी ०९/०० वा.चे दरम्यान प्लॉट नं.७/ ए.दुसरा मजला शिबा सोसायटी भाऊ पाटील रोड बोपोडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची टेरेस वरील रुम कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने टेरेस वरील रुमचे कुलुप तोडून कपाटाचे लॉक तोडून कपाटामध्ये ठेवलेली रोख १०,००,०००/- रुपये व सोन्याचे दागिने असा एकुण १३,१०,०००/-किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.वैभव मगदुम मो.नं.९१७५९०२८०८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे.५९२/२०२३,भादविक ३९४,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ५६ वर्षे,रा.वडगावशेरी,पुणे. |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/१२/२०२३ रोजी रात्रौ ००/१० वा.चे.सुमारास शुभम सोसायटी रोडवरील,साईराम एन्टरप्राईस या वर्कशॉपसमोरील मोकळया जागेत. सोपाननगर,वडगावशेरी, पुणे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी घरी जात असताना समोरून आलेल्या दोन अनोळखी इसमांनी फिर्यादी यांना पकडुन हाताने माराहण करून साईराम एन्टरप्रायझेस गेटचे समोरील मोकळ्या जागेत ढकलुन देवुन पॅन्टचे खिशातुन रोख ३५०/- रूपये व मोबाईल असा एकुण ५,३५०/- रू.किंमतीचा  मुद्देमाल फिर्यादी यांना जखमी करून जबरदस्तीने घेवुन गेलेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अरविंद कुमरे मो.नं.९५५२५३८३७१ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो.स्टे.९३६/२०२३,भादविक ३०४ (अ),२७९ मोटार वाहन कायदा १३४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | देवेन्द्र सिंह, वय २८ वर्षे, रा.बाणेर,पुणे, |
| **आरोपीत** | अज्ञात मोटार सायकलस्वार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २४/१२/२०२३ रोजी रात्रौ २०/१० वा.चे सुमारास छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, बाणेर रोड पुणे रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी फिर्यादी यांचा लहान भाऊ रवि सिंह, वय २५ वर्षे, रा.वेस्कॉन पॅराडाई सोसायटी,बाणेर रोड,पुणे,याचे मोटार सायकला धडक देवुन,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.राजकुमार केंद्रे,मो.नं.८८८८९९३३९९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो.स्टे.८२९/२०२३,भादविक ३२६,३२३,५०४,५०६, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१)(३) सह १३५, क्रिमिनल लॉ अमेंडमेंट कलम ७ |
| **फिर्यादी** | संतोष वाडेकर वय ५२ वर्षे, रा.कात्रज,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २५/१२/२०२३ रोजी सकाळी ०७/३० वा.चे सुमारास कै.अनंत फाटे रिक्षा स्टॅड,कात्रज कोंढवा रोड,कात्रज पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचा भाऊ असे रिक्षा स्टॅंडवर रिक्षामध्ये पॅसेंजर भरत थांबलेले असताना नमुद इसम याने त्याची रिक्षा हि फिर्यादीचे रिक्षा पुढे लावुन दादागिरी करुन त्याचे रिक्षामध्ये सिट भरत असल्याने फिर्यादीचा भाऊ याने त्याबाबत जाब विचारला असता त्याचा राग येवुन त्याने त्याचे रिक्षामधील लोखंडी रॉड काढुन हवेत फिरवुन मोठमोठयाने शिवीगाळ करुन या रिक्षा स्टॅडचा मी भाई आहे,माझ्या नादाला कोणी लागले तर एकाएकाला जिवंत सोडणार नाही अशी धमकी देत परिसरात दहशत करत हातातील लोखंडी रॉडने फिर्यादीचे डोक्यावर व डाव्या हातावर फटके मारुन गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नितीन जाधव ७३८५१८५७७२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**